जनसामान्यांच्या मनातील आरसा

Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड | सोमवार

०३.०८.२०२६

# वरुड दर्पण

संपादक - चंद्रकांत भा. भड

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235

chandubhad@gmail.com

www. waruddarpan.com

9422157712, 8669533485

वर्ष: ०७ | अंक: २७ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

+91 7745067712

## थोडक्यात

### नाशिकच्या खड्ड्यांच्या मुद्द्यावरुन राजकीय वातावरण तापलं : चंद्रशेखर बावनकुळे

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नाशिक** - शहरातील रस्त्यांवरील खड्ड्यांच्या प्रश्नावरून पुन्हा एकदा राजकारण तापले आहे.

'दत्तक नाशिकचे पालक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब, भुजबळ साहेबांना पालकमंत्री करुन नाशिककरांना खड्ड्यातून बाहेर काढा, ही सर्वसामान्य नाशिककरांच्या मनातील भावना आहे,' अशा आशयाचे होर्डिंग राष्ट्रवादी युवक काँग्रेसने शहरात लावेल आहे.

एकीकडे नाशिकच्या खड्ड्यांच्या मुद्द्यावरून राजकीय वातावरण तापलं असताना भाजपचे नेते आणि राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या प्रकरणावर भाष्य करत प्रतिक्रिया दिली आहे.

# तरुणाई गुलामगिरीत अडकली

## बाहेर निघण्यासाठी आता फक्त एकमेव मार्ग : तुकाराम मुंढेंचं आवाहन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** - तरुणांना व जेन-झी पिढीला योग्य दिशा मिळाल्यास भारत जगातील सर्वात शक्तिशाली देश बनू शकतो. बदलत्या तंत्रज्ञानानुसार आवश्यक असणारी कौशल्ये आजपासूनच आत्मसात करावीत, असं एफडीएचे आयुक्त आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांनी सांगितलं. अमरावतीमध्ये आयोजित 'संवाद तरुणाईशी' या कार्यक्रमात तुकाराम मुंढे यांनी जेन-झी तरुणांना मार्गदर्शन केलं. यावेळी तुकाराम मुंढेंनी विविध मुद्द्यांवर भाष्य केलं.




तरुणांनी न्यूनगंड बाजूला ठेवून स्वतःच्या क्षमतेवर विश्वास ठेवावा, सोशल मीडियावरील प्रत्येक गोष्टीवर आंधळा विश्वास ठेवू नये आणि एआयचा वापर विवेकाने करावा, असा सल्लाही तुकाराम मुंढेंनी दिला. शिक्षणासोबत कौशल्य, विचारशक्ती आणि विवेक विकसित करणे हीच आजच्या जेन-झी पिढीच्या यशाची खरी गुरुकिल्ली आहे. बदलत्या तंत्रज्ञानानुसार आवश्यक असणारी कौशल्ये आजपासूनच आत्मसात करावीत, असं तुकाराम मुंढे म्हणाले. तरुणाई गुलामगिरीत अडकली, बाहरे निघण्यासाठी 'हा' एकमेव मार्ग आता आपण ऐकतच नाही, फक्त आवाज करतो. आता ऐकण्याची सवय राहिलेली नाही. मला तेच बघायचंय, तेच ऐकायचंय, तेच करायचंय जे मला आवडतं. या गुलामगिरीत आपण जर फसलो आहोत, त्याच्यातून बाहेर निघण्यासाठी एकमेव मार्ग... ज्ञानाच्या पलीकडे जाऊन, मशीनमध्ये नाही, अल्गोरिदममध्ये नाही, अख मध्ये नाही. तर तो म्हणजे फक्त विवेक हा आहे. आणि त्या विवेकाची कास धरणं, चालणं ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. विचार करण्याची वेळ तुमच्या-माझ्यावरती आलेली आहे- तुकाराम मुंढे महाराष्ट्राचा खूप मोठा इतिहास आहे. या महाराष्ट्र राज्यामध्ये ज्यावेळेस इतिहासाबद्दल बोलतो, संत परंपरा लाभलेली आहे, संतांचे विचार लाभलेले आहेत, खूप मोठ्या प्रमाणात समाजसुधारक लाभलेले आहेत. ज्यांनी जगाला मार्ग दाखवला. सावित्रीबाई फुले, शाहू महाराज, छत्रपती शिवाजी महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर. कित्येक नावं आपण घेऊ शकतो.

# कोटयावधींची फसवणूक करणाऱ्या आरोपींना ४ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी

## गुंतवणुकीचे आमिष, अनेक कुटुंबीयांची फसवूणक

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मोर्शी** - शहरातील दीप कॉलनी परिसरात राहणाऱ्या अवि बुंगे व त्यांची पत्नी इतर दोन आरोपींनी जादा परताव्याचे आमिष दाखवून नागरिकांची तब्बल ७ कोटी १९ रुपयांची फसवणूक केल्याची तक्रार थेट महिलांसह नागरिकांनी पोलीस अधीक्षक यांच्याकडे दि. ३० जुलै रोजी केली होती. त्या अनुषंगाने दि. ३१ जुलै रोजी चारही आरोपींविरुद्ध मोर्शी पोलिसांनी विविध गुन्हे दाखल करून मोर्शी येथील अवि बुंगे व त्यांची पत्नी या दोन आरोपींना अटक केली असून फरार दोन आरोपींचा मोर्शी पोलीस कसोशीने शोध घेत आहे. अटक करण्यात आलेल्या दोन आरोपींचा दि. ४ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली.




पोलीस सूत्रांनुसार आरोपी कथित महिला व तिचे पती अवि बुंगे यांनी सुरुवातीला आपल्या नातेवाईकांकडून व परिचितांकडून एक ते दीड कोटीची रक्कम घेऊन विश्वास निर्माण करण्यासाठी काही जणांना सुरुवातीच्या टप्प्यात ठरल्याप्रमाणे जादा रक्कम व व्याजही परत केले. त्यामुळे त्यांच्यावर नागरिकांचाविश्वास बसू लागला. या आमिषाला बळी पडून अनेकांनी पाच लाख, दहा लाख, वीस लाख, तर काहींनी तब्बल दीड कोटी रुपयांपर्यंत रक्कम त्यांच्याकडे दिल्याचे उघडकीस आले आहे. हा प्रकार गेल्या पाच ते सात वर्षांपासून सुरू असल्याचे बोलले जात असून काही कालांतर गुंतवणूकदारांनी पैसे परत मागण्यास सुरुवात केली. मात्र संबंधित महिलेने पैसे परत न करता टाळाटाळ करीत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. अखेर पीडित नागरिकांनी अमरावती ग्रामीणचे पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्याकडे तक्रार केली. पोलीस अधीक्षकांनी संबंधित पोलीस ठाण्याला आवश्यक पुरावे गोळा करून सखोल चौकशी करण्याच्या सूचना दिल्या होत्या. दरम्यान याप्रकरणी मोर्शी पोलिसांनी चारही आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल करून अवि बुंगे व त्यांची पत्नी या दोन आरोपींना अटक करून न्यायालयासमोर हजर केले असता ४ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली. इतर पसार दोन आरोपींचा मोर्शी पोलीस

# मुलाकडून जन्मदात्रीला जिवंत जाळण्याचा प्रयत्न

## खुनाचा प्रयत्न प्रकरणी मुलाला काही तासांत अटक

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** - किरकोळ वादातून एका तरुण मुलाने आपल्याच जन्मदात्या आईला जिवंत जाळण्याचा प्रयत्न केल्याची खळबळजनक घटना तालुक्यातील बहादा येथे समोर आली आहे. ३१ जुलै रोजी सकाळी १० च्या सुमारास घडलेल्या या प्रकरणी वरुड पोलिसांनी खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल करुन आरोपी मुलाला अवघ्या काही तासांतच बेड्या ठोकल्या आहेत. शीला ज्ञानेश्वर मरसकोल्हे (५५) असे गंभीररीत्या होरपळलेल्या महिलेचे नाव आहे.




एफआयआरनुसार विशाल ज्ञानेश्वर मरसकोल्हे (३५, रा.बहादा, ता.वरुड) असे अटक आरोपीचे नाव आहे. आरोपीने आई शीला यांना 'घरातून निघून जा, येथे राहू नकोस,' असे म्हणत वाद घातला. वादाचे रुपांतर शिवीगाळ व लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यात झाले. एवढ्यावरच न थांबता, त्याने घरातील बाटलीत साठवून ठेवलेले पेट्रोल जिवे मारण्याच्या उद्देशाने आईच्या अंगावर ओतले आणि माचिसने पेटवूनदेऊन तो घटनास्थळावरुन पसार झाला.

शीला यांच्या ओरडण्याच्या आवाजाने शेजारील नागरिक तातडीने धावून आले. त्यांनी आग विझविण्याचा प्रयत्न केला. त्यांनी आगदेखील विझवली. दरम्यान, या जीवघेण्या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या शीला यांना उपचारासाठी वरुड ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, सध्या तिथे त्यांच्यावर वैद्यकीय उपचार सुरु आहेत. यामुळे बहादा येथे मोठी खळबळ उडाली. या प्रकरणी पीडितेच्या जबानी रिपोर्ट आणि वैद्यकीय प्रमाणपत्राच्या आधारे वरुड पोलिसांनी आरोपी मुलाविरोधात खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा नोंदवला आहे. पोलिस उपनिरीक्षक सिद्धेश्वर उमाळे यांच्या तक्रारीवरुन पोलिसांनी तपासचक्र वेगाने चालवत ३१ जुलै रोजी सायंकाळी ७:२५ वाजता आरोपीला अटक केली. या प्रकरणाचा तपास एपीआय राहुल जाधव करीत आहेत.

# विवाहितेचा शारिरीक व मानसिक छळ करणाऱ्या पतीसह सासरकडील ४ जणांविरुध्द गुन्हा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** - विवाहितेचा शारिरीक व मानसिक छळ करणाऱ्या पतीसह सासरकडील ४ जणांविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

सविस्तर माहीती नुसार, १० जुन २०२५ ते ३१ जुलै २०२६ दरम्यान पती, सासु, सासरे व ननद यांनी घरगुती कारणावरुन व माहेरवरुन पैसे आणने कामी तगादा लावुन शिवीगाळ करुन मानसिक व शारिरीक छळ केला, अशा फिर्यादी दुर्गा गजानन गंधे (२९) हिच्या तक्रारीवरुन आरोपी पती शुभम गजानन गंधे (३०), सासरे गजानन विठठलराव गंधे (५५), सासु राजकन्या ग.गंधे (५०) तिन्ही रा.वाठोडा हैबतपुर, ता.आर्वी, जि.वर्धा, शुभांगी राजु रोकडे (२७) रा.गाडेगाव ह.मु.वाठोडा हैबतपुर, ता.आर्वी, जि.वर्धा यांचे विरुध्द कलम ८५, ३५२, ३ (५) बी.एन.एस. अन्वये गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरु आहे.















# गणेश दत्त गुरुमंदिरात गुरुपौर्णिमा भक्तिभावात साजरी : गुणवंत विद्यार्थ्यांचा ग्रंथ व प्रशस्तीपत्र देऊन गौरव

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – स्थानिक गणेश दत्त गुरुमंदिरात रविवारी (दि.२ ऑगस्ट) गुरुपौर्णिमा उत्सव भक्तिमय वातावरणात आणि मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. वैदिक मंत्रोच्चारात रुद्राभिषेक, सद्गुरूंचे पूजन, प्रेरणादायी मार्गदर्शन, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार आणि महाप्रसाद अशा विविध धार्मिक व सांस्कृतिक उपक्रमांनी उत्सवाला विशेष रंगत आली.

उत्सवानिमित्त ध्यानगृहातील तिन्ही सद्गुरूंचा वैदिक मंत्रोच्चारात रुद्राभिषेक करून विधिवत पूजन करण्यात आले. यानंतर विविध क्षेत्रांत उल्लेखनीय यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा ग्रंथ व प्रशस्तीपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. यामध्ये ईश्वर अंबिलकर, आर्यन खेडीकर, इशिका खेडीकर, शर्वरी बोधनकर, जीत बोधनकर, तेजस्विनी चेटुले, उज्वल वंजारी आणि अंशुमन मस्के या विद्यार्थ्यांचा समावेश होता.

यावेळी नागपूर येथून सद्गुरूंच्या पादुकांचे आगमन झाले. गुरुमंदिर, नागपूर येथील ज्येष्ठ उपासक तथा कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रा. संजयराव देशकर यांनी आपल्या प्रेरणादायी मार्गदर्शनातून सद्गुरूंच्या विचारांचे महत्त्व आणि त्यांचे आचरण जीवनाला योग्य दिशा देणारे असल्याचे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.अरुण कडबे होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात गुरुतत्त्वाचे आध्यात्मिक महत्त्व, भारतीय संस्कृतीतील गुरु–शिष्य परंपरेचे स्थान आणि गुरुपौर्णिमेचे वैशिष्ट्य यावर सविस्तर मार्गदर्शन केले.

यावेळी माधुरी कानतोडे यांनी सुमधुर स्वरांत सद्गुरु स्तवन सादर करून वातावरण भक्तिमय केले. ॲड.चंदन रणदिवे व शिल्पा रणदिवे यांनी कार्यक्रमाचे यजमानपद भूषविले. कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन डॉ.स्वाती मुंडले यांनी केले. आरती, सद्गुरूंच्या जयघोष आणि महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी दत्ता खेडीकर, वसंतराव कानतोडे, दिलीप खटले, दिगंबर वाघाये, सुरेश डोर्लीकर, प्रकाश अंबिलकर, उषा कडबे, शीला भांडारकर, वंदना खेडीकर, सुषमा वंजारी, रेखा निर्वाण, एकता पऱ्हाड, गीता बेळखोडे आणि दया गभने यांनी विशेष परिश्रम घेतले. उपस्थित उपासकांनी गुरुपौर्णिमेचा उत्सव श्रद्धा, भक्ती आणि उत्साहाच्या वातावरणात साजरा करून सद्गुरूंच्या चरणी कृतज्ञता व्यक्त केली.

---

### डॉ.अनिल बोंडे यांच्या वाढदिवसानिमित्त

# आज महाआरती व वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते व मार्गदर्शक डॉ.अनिल बोंडे यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टी महिला मोर्चा यांच्या वतीने महाआरती व वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम उद्या ३ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता श्री संत गजानन महाराज मंदिर वरुड येथे पार पडणार आहे.

या कार्यक्रमाला आमदार चंदू उर्फ उमेश यावलकर यांची प्रमुख उपस्थिती लाभणार असून त्यांच्या हस्ते महाआरती व वृक्षारोपण करण्यात येणार आहे. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत सामाजिक बांधिलकी जपण्याच्या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या निमित्ताने भारतीय जनता पार्टीचे सर्व बूथ प्रमुख, पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून डॉ.अनिल बोंडे यांना शुभेच्छा अर्पण कराव्यात आणि कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

कार्यक्रमाचे आयोजन भारतीय जनता पार्टी महिला मोर्चा प्रदेश सचिव अंजली तुमराम, वरुड शहराध्यक्ष भाजप महिला मोर्चा आरती चिंचमालातपुरे, वरुड मंडळ अध्यक्ष भाजप महिला मोर्चा विद्या भुंबर आणि वरुड मंडळ अध्यक्षा भाजप महिला मोर्चा प्रतिभा महल्ले यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले आहे.

---

# विद्यानिकेतन सीबीएसई स्कूलमध्ये गुरूपौर्णिमा उत्साहात साजरी

### आंतरशालेय गीत गायन स्पर्धेचे आयोजन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**धामणगावरेल्वे** – धामणगाव एज्युकेशन सोसायटी द्वारा संचालित विद्यानिकेतन सीबीएसई स्कूलमध्ये गुरुपौर्णिमा उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली.

यानिमित्ताने आंतरशालेय गीत गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात शाळेचे संचालक राजेंद्र जोशी व प्राचार्य बेनी सॅम्युअल यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने करण्यात आली. यावेळी रंजुश्री शेंडे यांनी गुरुपौर्णिमेचे महत्त्व विशद करत गुरु–शिष्य परंपरेचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. तर अनुराधा पिंजारी यांनीही गुरूंच्या योगदानावर मार्गदर्शनपर भाषण केले. वर्ग ८ चा प्रियांश राठी आणि प्रांजली मोटवानी या विद्यार्थ्यांनी भाषणे केली.

गुरुजनांविषयी आदर, कृतज्ञता आणि संस्कारांची भावना विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्याच्या उद्देशाने आयोजित गीत गायन स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत उत्कृष्ट सादरीकरण केले. यामध्ये गट 'अ' प्रथम क्रमांक वर्ग ४ ची अनघा खडकाळे हिने पटकविला तर द्वितीय वर्ग २ ची अधिरा गावंडे, हिमांशी राठी, तृतीय क्रमांक वर्ग २ ची तत्विका धंदूकिया तर चतुर्थ क्रमांक वर्ग ३ ची नंदिनी भेंडे व समिधा वाघ हिने पटकविला. तसेच गट 'ब' प्रथम क्रमांक वर्ग ६ ची तत्विका राऊत व वर्ग५ची प्रीशा राठी हिने पटकविला. द्वितीय वर्ग ६ची कादंबरी वानखडे तृतीय वर्ग ६ची यशस्वी कडू, व चतुर्थ क्रमांक सानवी मिश्रा हिने पटकविला.

या सर्व उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचे मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन कौतुक करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेली आकर्षक ग्रीटिंग कार्ड शिक्षकांना भेट देऊन गुरुपौर्णिमेनिमित्त शिक्षकांचा सन्मान केला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या मनातील गुरुजनांविषयीचा आदर आणि कृतज्ञता व्यक्त झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन निकिता खेकडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संगीत विभागासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

---

# श्रीमती जीटीएस विद्यालयातील विद्यार्थिनींची शिष्यवृत्तीस उल्लेखनीय कामगिरी

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**वरुड** – महाराष्ट्र राज्य शिक्षण विभागामार्फत आयोजित इयत्ता सातवी शिष्यवृत्ती परीक्षा २०२५–२६ मध्ये हातूर्णा येथील श्रीमती जी.टी.एस. विद्यालयाच्या ३ विद्यार्थिनींनी उल्लेखनीय यश संपादन करत शिष्यवृत्तीसाठी पात्रता मिळवीली आहे.

विद्यालयातील नंदिनी गजानन धोटे, संस्कृती गजानन खोपे आणि श्रावणी निलेश सोनोले यांनी उत्कृष्ट गुणवत्तेच्या बळावर शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश मिळवत विद्यालयाची गौरवशाली परंपरा कायम राखली.

विद्यार्थिनींच्या या यशाबद्दल विद्यालयाचे मुख्याध्यापक संजय नवले यांनी त्यांचे विशेष अभिनंदन करत भविष्यातही अशाच गुणवत्तापूर्ण कामगिरीची अपेक्षा व्यक्त केली. तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी, हातूर्णा शिक्षण संस्थेचे पदाधिकारी आणि ग्रामस्थांनी यशस्वी विद्यार्थिनींचे कौतुक करुन शुभेच्छांचा वर्षाव केला.

यशस्वी विद्यार्थिनींनी त्यांच्या यशाचे श्रेय विद्यालयातील शिक्षकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन, पालकांचे प्रोत्साहन आणि नियमित अभ्यासाला दिले. त्यांच्या या यशामुळे विद्यालयातील इतर विद्यार्थ्यांनाही शिष्यवृत्ती परीक्षेसाठी प्रेरणा मिळाली असून गुणवत्तापूर्ण शिक्षणाची परंपरा अधिक बळकट झाल्याचे समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

---

# देशातील सर्वाधिक हाय व्होल्टेज पोटनिवडणुकीची मतमोजणी सुरू

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – बिहार, मध्य प्रदेश आणि गुजरात येथील तीन विधानसभा जागांवर झालेल्या पोटनिवडणुकांसाठी मतमोजणी आज (३ ऑगस्ट) सकाळी ८ वाजता सुरू झाली. या तिन्ही जागांसाठी ३० जुलै रोजी मतदान झाले होते. यापैकी, मध्य प्रदेशातील दातिया येथे सर्वाधिक ७१.४४ टक्के मतदान झाले, त्याखालोखाल गुजरातमधील मांजलपूर येथे ३७.५ टक्के आणि बिहारमधील बांकीपूर येथे ३४.३ टक्के मतदान झाले. कमी मतदान होऊनही, बांकीपूर जागेची सर्वाधिक चर्चा आहे. जनसुराज पक्षाचे संस्थापक प्रशांत किशोर येथून पहिल्यांदाच निवडणूक लढवत आहेत.

---

# न्यू ऑरेंज सिटी कॉन्व्हेंटमध्ये सहाव्या रानभाजी महोत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद

(प्रतिनिधी वरुड दर्पण)





**वरुड** – बदलती जीवनशैली, वाढते जंक फूडचे आकर्षण आणि निसर्गापासून दूर जात असलेली तरुण पिढी यांना आरोग्यदायी पर्यायाची ओळख करुन देण्यासाठी न्यू ऑरेंज सिटी कॉन्व्हेंट आणि श्री विश्वकृपा आयुर्वेदालय व पंचकर्म केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेला सहावा 'रानभाजी महोत्सव' उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. 'साद आरोग्याची वाट निसर्गाची' या ब्रीदवाक्याखाली आयोजित या उपक्रमाला विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या महोत्सवाची संकल्पना श्री विश्वकृपा आयुर्वेदालयाचे संचालक तथा प्रसिध्द आयुर्वेदाचार्य डॉ.चरण सोनारे यांची असून गेल्या ६ वर्षांपासून हा उपक्रम सातत्याने राबविला जात आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष सुधाकर ठाकरे तर उदघाटन निमा आयुर्वेद फोरम महाराष्ट्राचे राज्याध्यक्ष डॉ.अमोल ठवळी यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ.राम गोधने, सचिव अनिल गुल्हाने, कोषाध्यक्ष डॉ.वेदांत राजोरिया, माजी अध्यक्ष गोपाल वानखडे, सहसचिव शाम खंडेलवाल, सदस्य विनय यावलकर यांच्यासह निमा माजी राज्याध्यक्ष डॉ.दिनेश गवळी आणि निमा वुमन फोरमच्या राज्य प्रतिनिधी डॉ.मीना बंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

उदघाटनपर भाषणात डॉ.अमोल ठवळी यांनी पावसाळ्यात उपलब्ध होणाऱ्या रानभाज्या या रोगप्रतिकारक शक्ती वाढविणाऱ्या नैसर्गिक संपत्ती असल्याचे सांगितले. माजी अध्यक्ष गोपाल वानखडे यांनीही विद्यार्थ्यांना निसर्गाशी जोडणाऱ्या या उपक्रमाचे कौतुक करत अशा उपक्रमांची परंपरा कायम ठेवण्याचा विश्वास व्यक्त केला.

या कार्यक्रमाला विविध क्षेत्रांतील वैद्यकीय तज्ज्ञ, सामाजिक कार्यकर्ते आणि मान्यवरांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे कौतुक केले. तसेच पाकप्रदर्शनीचे परीक्षण करण्यासाठी अनुभवी परीक्षक मंडळाची नियुक्ती करण्यात आली होती. या उपक्रमाचे आयोजन संचालक श्री विश्वकृपा आयुर्वेदालय व पंचकर्म केंद्र डॉ.चरण सोनारे आणि मुख्याध्यापिका माधुरी भोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

कार्यक्रमाचे संचालन आणि आभार अंचल काळे यांनी मानले. महोत्सवाच्या आयोजनासाठी श्वेता गणोरकर, किशोर देशमुख, पराग भोंडे तसेच शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

---

### न्यू कॅलिफोर्निया इंग्लिश प्रायमरी स्कूलच्या

# विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**वरुड** – महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने आयोजित प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा २०२५–२६ मध्ये न्यू कॅलिफोर्निया इंग्लिश प्रायमरी स्कूल येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेची उज्वल परंपरा कायम राखली आहे. इयत्ता चौथी व सातवीतील एकूण ९ विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले आहे.

इयत्ता चौथीमधून जयेश यावले व स्वराज बारमासे, तर इयत्ता सातवीमधून सृष्टी वानखडे, गिरीश निंभोरकर, स्वराज राऊत, सिद्धेश सातपुते, तानिया नवले, मनश्री चरपे आणि आर्या वानखडे यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन करुन शाळेचा नावलौकिक उंचावला.

विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल गुरु सेवा शैक्षणिक विकास संस्थेचे अध्यक्ष अमोल निंभोरकर, उपाध्यक्ष पंकज गोहाड, सचिव स्वाती निंभोरकर तसेच संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करुन त्यांच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी मुख्याध्यापक हर्षल झोड यांनी विद्यार्थ्यांच्या यशामागे त्यांची मेहनत, पालकांचे सहकार्य आणि शिक्षकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन असल्याचे सांगितले. शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनीही गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक करत त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# संपादकीय

{ प्रयत्न करणे कधीही सोडू नका, अपयश हा यशाच्या मार्गातील फक्त एक टप्पा आहे. }

## पेपरफुटीला आळा कधी? विद्यार्थ्यांचा संयम संपत चालला

भारतीय शिक्षण व्यवस्था ही केवळ ज्ञानप्राप्तीचे माध्यम नसून देशाच्या सामाजिक, आर्थिक आणि नैतिक विकासाचा भक्कम पाया मानली जाते. विद्यार्थ्यांच्या कष्टाला न्याय देणारी, गुणवत्तेला संधी देणारी आणि समान स्पर्धेचे व्यासपीठ निर्माण करणारी परीक्षा व्यवस्था ही शिक्षण व्यवस्थेचा आत्मा आहे. परंतु गेल्या काही वर्षांपासून वारंवार घडणाऱ्या प्रश्नपत्रिका फुटीच्या घटनांनी या व्यवस्थेच्या विश्वासार्हतेलाच मोठे ग्रहण लागले आहे. जणू काही शिक्षण व्यवस्थेलाच 'पेपरफुटी' नावाचा कॅन्सर जडला आहे. हा कॅन्सर केवळ प्रश्नपत्रिका गळतीपुरता मर्यादित नसून तो विद्यार्थ्यांच्या भविष्यावर, पालकांच्या विश्वासावर आणि समाजाच्या नैतिक मूल्यांवर घाला घलत आहे. आज स्पर्धा परीक्षांपासून ते शालेय, महाविद्यालयीन आणि भरती परीक्षांपर्यंत अनेक ठिकाणी प्रश्नपत्रिका फुटल्याच्या घटना समोर येतात. एखाद्या परीक्षेची तयारी करण्यासाठी विद्यार्थी अनेक महिने अथक परिश्रम घेतात. पालक मोठ्या आर्थिक त्यागातून मुलांना शिक्षण देतात. मात्र परीक्षा होण्याच्या काही तासांपूर्वी किंवा काही दिवस आधी प्रश्नपत्रिका काही मोजक्या लोकांच्या हाती पोहोचते आणि संपूर्ण परीक्षा व्यवस्थेची विश्वासार्हता धुळीस मिळते. त्याचा सर्वाधिक फटका प्रामाणिकपणे अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना बसतो. पेपरफुटी हा केवळ तांत्रिक दोष नाही, तर तो नैतिक अधःपतनाचा गंभीर परिणाम आहे. पैसा, भ्रष्टाचार, सत्तेचा गैरवापर आणि काही अधिकाऱ्यांची बेपर्वाई यामुळे अशा घटना घडतात. प्रश्नपत्रिका तयार करणे, छपाई, वाहतूक आणि वितरण या प्रत्येक टप्प्यावर गोपनीयता राखणे अपेक्षित असते. मात्र या साखळीतील एखादी कमकुवत कडी संपूर्ण व्यवस्थेला कलंकित करते. अनेकदा संगनमताने प्रश्नपत्रिका विकल्या जातात, त्यातून लाखो रुपयांचे व्यवहार होतात आणि शिक्षणाचे पावित्र्य बाजारात विकले जाते. या घटनांचा विद्यार्थ्यांवर होणारा मानसिक परिणाम अत्यंत गंभीर आहे. वर्षभर मेहनत घेऊनही परीक्षा रद्द झाल्यास विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास खचतो. पुन्हा परीक्षा देण्यासाठी त्यांना मानसिक, शारीरिक आणि आर्थिक त्रास सहन करावा लागतो. काही विद्यार्थ्यांच्या वयाची मर्यादा संपते, तर काहींची नोकरी किंवा पुढील शिक्षणाची संधी हुकते. या अन्यायामुळे अनेक तरुणांमध्ये व्यवस्थेबद्दल संताप आणि निराशा निर्माण होते. ही परिस्थिती कोणत्याही सुदृढ लोकशाहीसाठी धोक्याची आहे. पेपरफुटीमुळे गुणवत्तेपेक्षा गैरमार्गाने यश मिळिवण्याची प्रवृत्ती वाढते. मेहनतीपेक्षा पैशाच्या बळावर किंवा बेकायदेशीर मार्गाने यश मिळू शकते, असा चुकीचा संदेश समाजात जातो. त्यामुळे प्रामाणिकपणा, परिश्रम आणि नैतिक मूल्यांवरील विश्वास कमी होतो. अशा वातावरणात भविष्यातील सक्षम डॉक्टर, अभियंते, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी आणि इतर व्यावसायिकांची गुणवत्ता धोक्यात येऊ शकते. याचा थेट परिणाम देशाच्या विकासावर होतो. या समस्येवर केवळ कठोर कायदे करून चालणार नाही, तर त्यांची प्रभावी अंमलबजावणीही तितकीच आवश्यक आहे.

## आजचे राशी भविष्य

रविवार, 2 ऑगस्ट 2026

1. मेष - आज आत्मविश्वास वाढेल आणि कामात यश मिळेल. आर्थिक लाभ होण्याची शक्यता आहे.
2. वृषभ - नवीन योजना आज फलदायी ठरतील. कुटुंबात आनंदाचे वातावरण राहील.
3. मिथुन - संवाद कौशल्याने कामे मार्गी लागतील. मानसिक तणाव कमी होईल.
4. कर्क - घरगुती कामात समाधान मिळेल. आर्थिक स्थिती सुधारेल.
5. सिंह - नोकरीत प्रगतीचे योग आहेत. मान-सन्मान वाढेल.
6. कन्या - आरोग्याची काळजी घ्या. प्रलंबित कामे पूर्ण होतील.
7. तुला - व्यवसायात लाभ होईल. नवीन संपर्क उपयोगी पडतील.
8. वृश्चिक- जुनी गुंतवणूक फायदेशीर ठरेल. कुटुंबासोबत वेळ आनंदात जाईल.
9. धनु - प्रवासाचे योग आहेत. धार्मिक कार्यात मन रमेल.
10. मकर - कामात स्थिरता येईल आणि यश मिळेल. आर्थिक स्थिती मजबूत होईल.
11. कुंभ - नवीन संधी मिळतील. मित्रांच्या मदतीने कामे पूर्ण होतील.
12. मीन - मन प्रसन्न राहील आणि कामात यश येईल. कुटुंबात सुख-शांती नांदेल.

|| श्री गणेशाय नमः || शुभ दिवस मंगलमय होवो हीच सदिच्छा!

# खा.डॉ.अनिल बोंडे : मोर्शी-वरुडच्या मातीत रुजलेला जिव्हाळ्याचा वटवृक्ष

**राजकारणात पदं येतात जातात. आमदारकी, खासदारकी, मंत्रीपद यांचा धुरळा उडतो आणि निघून जातो. पण काही माणसं अशी असतात की पद गेल्यावरही त्यांचं नाव आणि काम लोकांच्या मनातून जात नाही. अशीच एक ओळख म्हणजे डॉ.अनिल सुखदेवराव बोंडे.**

मोर्शी-वरुड मतदारसंघासाठी ते केवळ माजी आमदार किंवा खासदार नसून,आजही प्रत्येक कार्यकर्त्याचे आधारस्तंभ 'अनिलजी' आहेत. पद गेले तरी आपुलकी तशीच रस्त्यावर भेटल्यावर की खांद्यावर हात ठेवून विचारणारी तीच आपुलकी आजही कायम आहे. ते या क्षेत्राचे पालक आहेत या प्रमाणेच वागतात.

**वैद्यकीय डॉक्टर ते लोकसेवकाचा प्रवास–** डॉ.अनिल बोंडे हे पेशाने एमबीबीएस आणि एमडी केलेले वैद्यकीय डॉक्टर आहेत. डॉक्टर म्हणजे ज्याचा धर्मच सेवा करणे. हाच सेवेचा वसा घेऊन ते राजकारणात आले. २००९ ते २०१४ पर्यंत मोर्शी विधानसभा मतदारसंघातून अपक्ष आमदार म्हणून आणि २०१४ ते २०१९ पर्यंत भाजपकडून आमदार म्हणून त्यांनी काम पाहिले. २०१४ ते २०१९ या काळात ते महाराष्ट्र राज्याचे कृषी मंत्रीही होते. शेतकऱ्याचा पोरगा म्हणून त्यांनी शेतकऱ्यांची व्यथा जवळून पाहिली होती. म्हणूनच कृषीमंत्री असताना त्यांनी शेतकरी कर्जमाफी, पीक विमा आणि सिंचनाच्या योजना जोरात राबवल्या. आज जुलै २०२२ पासून ते भारताच्या राज्यसभेवर संसदेचे सदस्य म्हणून काम करत आहेत. सोबतच भाजपच्या किसान मोर्चाचे राष्ट्रीय महासचिव/राष्ट्रीय सचिव म्हणूनही त्यांची जबाबदारी आहे. पद मोठं झालं, दिल्लीपर्यंत मजल मारली, तरी पाय मात्र मोर्शी-वरुडच्या मातीतच आहेत.

**पद गेलं, पण माणूसकी नाही गेली–** खरी परीक्षा पद गेल्यावर होते. बऱ्याच नेत्यांना पद गेलं की ते जनतेला विसरते. पण अनिलजींच्या बाबतीत तसं झालं नाही. कारण त्यांनी कधीच राजकारण हे 'पदासाठी' केलं नाही, ते 'जनतेसाठी' केलं. हे आपण कोरोना काळामध्ये कुठलेही पद नसताना जनतेच्या सेवेसाठी प्रत्यक्ष गावागावांमध्ये जाऊन रुग्णसेवेमधून अनुभवले आहे. आजही मोर्शी-वरुडमध्ये कुठलंही महत्वाचं काम असो, सर्वात आधी नाव येतं ते अनिल बोंडेचं. रस्ता, पाणी, आरोग्य, शिक्षण असो की एखाद्या गरीबाचा दवाखान्याचा खर्च – 'अनिलजींना सांगा' हे वाक्य अजूनही तितकंच वजनदार आहे. ते जात-पात मानत नाहीत. त्यांच्यासाठी माणूस फक्त 'माणूस' असतो. गोर-गरीब, शेतकरी, मजूर, महिला, तरुण – सगळ्यांसाठी त्यांचं दार आणि मन



दोन्ही २४ तास उघडं असतं. नेहमी गरिबांना मदतीचा हात देणे हा त्यांचा स्थायीभाव आहे. म्हणूनच आजही त्यांच्यासाठी जीवावर जीव देणारा कार्यकर्ता जिवंत आहे. कारण त्यांनी कार्यकर्त्याला फक्त निवडणुकीत वापरला नाही, तर कुटुंबातील सदस्य मानलं.

**विकासात मोठा वाटा–** मोर्शी-वरुडचा कायापालट करण्यात डॉ.बोंडेचा सिंहाचा वाटा आहे. आमदार आणि मंत्री असताना त्यांनी या भागात आरोग्य, शिक्षण, शेती आणि रस्त्यांच्या माध्यमातून मोठा विकास केला. ग्रामीण भागातील शेतकरी विकास हा त्यांच्या राजकारणाचा केंद्रबिंदू राहिला आहे. डॉक्टर असल्यामुळे आरोग्य क्षेत्राकडे त्यांचा कल जास्त. तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रे सक्षम करणे, गरजू रुग्णांना वैद्यकीय मदत मिळवून देणे यात त्यांनी पुढाकार घेतला. शेतकऱ्यांसाठी सिंचन, वीज आणि बाजारपेठेचे प्रश्न सोडवण्यासाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला. खासदार झाल्यावरही त्यांनी मोर्शी-वरुडला विसरले नाहीत. दिल्लीत बसूनही गावागावातील समस्या त्यांच्यापर्यंत पोहोचतात आणि त्यावर तोडगा निघतो. हाच त्यांचा सर्वात मोठा गुण आहे.

**नेतृत्वाची व्याख्या बदलणारे नेते–** आजच्या काळात नेता म्हणजे फक्त भाषणं देणारा, फोटो काढणारा आणि स्वार्थासाठी फिरणारा. पण डॉ.अनिल बोंडे या व्याख्येला छेद देतात. ते म्हणजे जमिनीवर काम करणारे, कार्यकर्त्यांना सोबत घेऊन जाणारे आणि जनतेशी नाळ जोडलेले नेते आहेत. त्यांच्याकडे गेल्यावर तुम्हाला 'माजी आमदार' किंवा 'खासदार' भेटत नाही, तर 'आपलं माणूस' भेटतं. म्हणूनच जनता त्यांना विसरली नाही, आणि विसरुही शकत नाही.

राजकारणात प्रामाणिकपणा, संवेदनशीलता आणि सातत्य हे फार दुर्मिळ झाले आहे. डॉ.अनिल बोंडे या तिन्ही गुणांचं उदाहरण आहेत. पदाची पर्वा न करता समाजसेवा करणे, हेच खरे नेतृत्व. त्याग, निष्ठा आणि समर्पण या तीन गुणामुळे माणूस मोठा होतो. बोंडे साहेब हे त्याचेच मूर्तिमंत उदाहरण आहेत. पक्षवाढीसाठी केलेल्या अथक परिश्रमाची पावती म्हणून त्यांना राज्यसभेवर संधी मिळाली अमरावती जिल्ह्यात पक्ष बळकट करण्यास आणि अधिकाधिक आमदार निवडून आणण्यास त्यांचे योगदान अनमोल आहे. जण माणसात असलेली त्यांची प्रतिमा आणि पक्षांवरील पकड यामुळे जनता आजही त्यांच्या सोबत आहे.

**शेवटी एकच म्हणता येईल –** मोठे पद मिळवणे सोपे आहे, पण मोठे माणूस बनणे कठीण आहे. आणि डॉ.अनिल सुखदेवराव बोंडे हे त्याचं जिवंत उदाहरण आहेत. आदरणीय बोंडे साहेब आपल्या अनुभवाचा प्रकाश आम्हाला नेहमी मार्ग दाखवतो, वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा! ईश्वर आपणास निरोगी दीर्घायुष्य देवो.



इंद्रभूषण श्रीराम सोंडे
पुसला, मो.नं. ९८९०२१६६६९


# शिवरायांचा आधुनिक मावळा म्हणजे क्रान्तिसिंह नाना पाटील

रशिया आणि यूरोपातल्या कम्युनिस्ट देशांनी ज्याना डोक्यावर घेतले, मार्क्सवाद, फुलेवादाने ज्यांना पछाडले होते, इंग्रजांनी ज्यांचा धसका घेऊन त्यांना पकडण्याकरिता जंग-जंग पछाडले होते असा क्रांतिपुत्र म्हणजे क्रांतीसिंह नाना पाटील. अशा नाना पाटलांचा सांगली जिल्ह्यात जन्म ३ ऑगस्ट १९०० मध्ये झाला.

नाना पाटील लहान असतानाच १९१४ ला महर्षि विठ्ठल रामजी शिंदे यांनी खेड येथे शेतकरी परिषद भरवली होती. त्या परिषदेतच नानांच्या हातात महात्मा फुले च्या विचारांची मशाल महर्षि शिंदेनी दिली. सन १९१८ ला कोल्हापुरच्या शाहू खासबाग मैदानात कुस्ती खेळण्यासाठी गेलेल्या नानांच्या हातातील फूलेवादाच्या मशालीला अधिक तेजाळ बनविण्यासाठी वैचारिक इंधन छत्रपती राजर्षी शाहूजी महाराजांनी पुरविले. १९१८ पासुनच्या नाना पाटलांच्या वैचारिक परिवर्तनाच्या कार्यात फुले- शाहुच्या विचारांचा प्रभाव दिसून येतो.

१९२८ नंतर नाना पाटील भारतीय स्वतंत्र्य लढ्याच्या चळवळीत उतरले. स्वातंत्र्य लढा आणि बहुजन समाजाचा विकास या दोन्ही मार्गाने त्यांचे कार्य सुरु झाले. फुले-शाहू महाराजांच्या विचारांचा जसा प्रभाव होता तसाच वारकरी संप्रदायाबरोबर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचार आणि लढ्याचेही आकर्षण होते. म्हणूनच इंग्रजांच्या विरुद्ध धारकरी म्हणून लढले. संत तुकाराम महाराज, शिवाजी महाराज, महात्मा फुले, शाहू महाराज यांच्या प्रभावातुन त्यांची वैचारिक बैठक निर्माण होत होती.

ब्रिटीशांच्या विरुद्ध लढत असतानाच त्यांच्या मनात छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याची संकल्पना आकारास येत होती. स्वराज्य निर्माण करण्याकरिता महाराजांनी सैन्याची गरज ओळखून तरुण मावाळयांची फौज निर्माण करुन स्वराज्य उभारले. शिवरायांची हिच प्रेरणा घेऊन आपण सुद्धा ब्रिटिश शासनास समांतर शासन यंत्रणा ऊभी केली पाहिजे असा विचार त्यांच्या मनात घोळत होता. 'आपुला आपणें करु कारभार' हे सूत्र आता त्यांनी स्विकारले. आपल्या देशाचा आपणच कारभार करण्याकरिता स्वतंत्र यंत्रणा निर्माण करून तिला संरक्षण देण्यकरिता आपली सेना असावी म्हणून त्यांनी 'तूफान सेना' या नावाने सैन्य दलाची स्थापना केली. या तूफान सेनेचे फील्ड मार्शल जी. डी. लाड होते. या सेनेची कुंडला येथे युद्धशाळा उभरण्यात आली. या युद्धशाळेतून प्रशिक्षित झालेल्या पाच हजार लोकांचे दोनशे दल स्वतंत्र्यपूर्व काळात ब्रिटीशांच्या नाकावार टिचुन काम करत होते. नंतर 'आपलाच देश-आपलाच कारभार' या संकल्पनेतून 'प्रतिसरकार (म्हणजेच स्वराज्य) स्थापन केले. म्हणजे ज्या-ज्या गावात प्रतिसरकार स्थापन केल्या गेली तिथे इंग्रजांचे कायदे आणि प्रशासन न मानत लोकहित गृहीत धरणारे कायदे व प्रसाशन सूरु झाले. प्रतिसरकारच्या माध्यमातून लोकन्यायलयाची स्थापना, दरोडेखोराना, -पिळवणुक करणाऱ्या सावकाराना, -पाटलांना, -कुलकर्णयना जबर शिक्षा, बाजार व्यवस्था, कष्टकरि - श्रमकरी वर्गाला अन्नधान्य पुरवणे अशी अनेक समाजोपयोगी कामे करण्यात येत होती.



सामान्य लोकांवर अन्याय करणाऱ्या ब्रिटीशांच्या पायाला पत्रे ठोकण्यात येत होते; म्हणून नाना पाटलांच्या प्रतिसरकारला 'पत्रिसरकार' असेही म्हणत असत. १९४३ ते १९४६ दरम्यान सातारा आणि सांगली जिल्हात सुमारे १५०० गावात प्रतिसरकार ची स्थापना करण्यात आली होती. या संकल्पनेचा प्रयोग पुढे देशातील अन्य भागातही करण्यात आला होता...

ज्या प्रमाणे मोगलांना छत्रपती शिवाजी महाराज कधी येतील आणि हल्ला करतील अशी भिती होती; तसेच नाना पाटील ब्रिटीशांच्या रेल्वे, पोस्ट आदि सेवावर हल्ला करुन ब्रिटीशांचे नमोहरण करत असत, म्हणून लोक त्यांना क्रान्तिसिंह म्हणू लागले. इंग्रजांनी त्यांना पकडण्याकरिता अनेक मोठ्या रक्कमांचे पुरस्कार जाहीर केले होते. परंतु नाना पाटील वेशांतर करण्यात इतके तरबेज होते की, इंग्रजांच्या समोर उभे राहूनही नाना पाटलांना इंग्रज ओळखू शकत नव्हते, जणू आधुनिक काळातील नाना पाटील म्हणजे बहिर्जी नाईकच. या आधुनिक बहिर्जीचा वेषांतरा बाबतीतचा एक प्रसंग आहे. इंग्रजांची त्यांना पकडण्यासाठी धरपकड सुरु होती. इंग्रज पोलिसांना बातमी कळाली की आज नाना पाटील दाढी करण्याकरिता गावात येणार आहेत म्हणून पोलीस गावात दाखल झाले. त्यावेळी नाना पाटील गावातील नाव्ह्याकडे दाढी बनवीत असताना त्यांना आरशात पाठीमागून येणारे पो-लीस दिसलें तसेच नानांनी स्वतःच्या तोंडाला लावलेला साबण पुसला आणि नाव्ह्याच्या तोंडाला साबण लावला. स्वतः वस्तरा हातात घेऊन नाव्ह्याच्या गळ्याजवळ पकडला आणि तंबी दिली की, 'गुमान बस, नाहीतर वस्तर्याने गळाच कापतो'. पोलीसांनी नानांना बघितले नव्हतं आणि तोंडाला साबण लावलेल्या नाव्ह्याला नाना पाटील समजून बेड्या ठोकल्या आणि त्याला काही बोलण्याची संधी न देता पोलीस स्टेशनला नेले. तिथं त्या नाहाव्याची नाना पाटील म्हणून चौकशी सुरु केली तेव्हा त्या नाहाव्याने सांगितलं की, 'मी नाना पाटील नाही आहे, जो माझी दाढी बनवीत होता तो नाना पाटील आहे.' पोलीसांसोबत नानाने असा गनिमी कावा केला.

नाना पाटलांची मात्र लेखकांनी, इतिहासकारांनी कायमच उपेक्षा केली. भारतातील इतिहास लेखन सुद्धा जातीवादापासून सुटू शकलेलं नाही. थांबलेल्या जहाजावरून ८-१० फुटाच्या उडीला जेवढे महत्व इतिहासकारांनी दिले तेवढे महत्व नाना पाटलांनी धावत्या रेल्वेतून ज्या नदीचे दोनही काठ पाण्याने भरलेले आणि हाता पायात बेडया पडल्या असताना कृष्णा नदीच्या पुलावर जेव्हा रेल्वे आली तेव्हा जवळपास ८०- ९० फुटांवरून उडी मारली आणि सहीसलामत सुटून इंग्रजांच्या हातून पसार झाले.परंतु ही नाना पाटलांची उडी आम्हा पर्यंत इथल्या जातीच्या चष्म्यातून पाहणाऱ्यां इतिहासकारांनी येवूच दिली नाही.

१५ ऑगस्ट १९४७ ला स्वातंत्र्य प्राप्तिनंतर जनतेला जसे स्वातंत्र्य हवे होते तसे स्वातंत्र्य मिळाले नाही म्हणून त्याच दिवशी, 'मिळालेले स्वतंत्र्य अपूर्ण आहे, हे फक्त राजकीय स्वातंत्र्य आहे. झेंडा बदलला, खुर्चीतला साहेब बदलला मात्र कष्टकरि, कामगार, मजूर, शेतकरी, दलित, आदिवासी, भटके यांच्या जीवनातील शोषण संपले नाही. आता फक्त कष्टकर्यना साथ'. अशी भूमिका घेऊन क्रान्तिसिंहाने कांग्रेस सोडून पुढे कम्युनिस्ट पार्टि आणि पुढच्या काळात फुले-शाहू यांच्या विचाराने चालाणाऱ्या शेतकरी कामगार पक्षाच्या झेंड्याखाली काम करु लागले. त्यावेळचे नाना पाटलांचे वाक्य ७० वर्षानंतर ही इथल्या शासन व्यवस्थेला लागू पडतय.

स्वतंत्र्यानंतर शांत बसतील ते क्रान्तिसिंह कसले, पुढे त्यांनी संयुक्त महाराष्ट्राची चळवळ, गोवा मुक्तिची चळवळ, भूमिहीन शेतकर्यांची चळवळ अशा सर्वहारा वर्गाच्या चळवळीत काम करत राहिले. पुढे १९५७ मध्ये सातारा आणि १९६७ ला बीड लोकसभा क्षेत्रातुन असे दोनदा संसदेत विक्रमी मतानी लोकांनी निवडून दिले. संसदेत आपल्या रांगड्या मराठी भाषेत भाषण करणारा पहिला सांसद होय. लोकनेते, लोकवक्ते आणि एक शस्त्र सेनापती म्हणून वावरलेल्या या क्रान्तिसिंहाचा मृत्यू ६ डिसेंबर १९७६ रोजी झाला. आज त्यांची जयंती. त्यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन.

— अनिल भुसारी
तुमसर, जि.भंडारा

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक – चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# प्राप्तिकर भरणारे ९४ हजार शेतकरी कर्जमाफीसाठी अपात्र

## राज्यातील पात्र शेतकऱ्यांच्या पीक कर्ज खात्यात 'या' दिवशी जमा होणार पैसे

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



***मुंबई*** – राज्य सरकारच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेसंदर्भात एक मोठी अपडेट समोर आली आहे.

या योजने अंतर्गत ९४ हजार प्राप्तिकर भरणारे शेतकरी अपात्र ठरले असल्याची माहिती आहे. राज्य सरकारच्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना–२०२६' अंतर्गत सहकार विभागाने या योजनेतील उर्वरित १६ लाख ९४ हजार पात्र शेतकऱ्यांच्या पीक कर्ज खात्यात येत्या जमा केले जाणार असल्याची माहिती आहे.

उद्या म्हणजेच मंगळवारी (४ ऑगस्ट ) एकाचवेळी सात हजार कोटी रुपये शेतकऱ्यांच्या पीक कर्ज खात्यात जमा होणार असल्याची माहिती सहकार विभागील सूत्रांनी दिली आहे. त्यामुळे या शेतकऱ्यांचा पुन्हा पीक कर्ज घेण्याचा मार्ग मोकळा होणार असल्याचे चित्र आहे.

एकाचवेळी सात हजार कोटी रुपये शेतकऱ्यांच्या पीक कर्ज खात्यात जमा होणार दरम्यान, राज्य सरकारने कर्जमुक्ती योजनेच्या माध्यमातून ज्या शेतकऱ्यांचे ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत पीक कर्ज थकीत आहे, त्यांना दोन लाखांच्या मर्यादेत कर्जमाफी देण्याची तसेच नियमित पीक कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपये प्रोत्साहन निधी देण्याची घोषणा केली आहे. त्याचप्रमाणे दोन लाखपिक्षा अधिक कर्ज थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांनी त्यांच्या हिश्शाची दोन लाखांवरील रक्कम बँकेत भरल्यानंतर एकवेळ समझोता अंतर्गत त्यांच्याही कर्ज खात्यात सरकार दोन लाख रुपये जमा करणार आहे. या योजनेनुसार पहिल्या टप्यात दोन लाखांच्या आतील कर्जदार शेतकऱ्यांची यादी सरकारने छाननीसाठी प्राप्तिकर विभागाकडे पाठविली होती. त्यात ९४ हजार शेतकरी आढळून आले असून आता त्यांना या योजनेतून अपात्र ठरविण्यात आले आहे.




**वरुड :** अमरावती ग्रामीणचे नवनियुक्त पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत व शुभेच्छा देताना लोणी तंटामुक्ती समिती अध्यक्ष राजू मालपे, सामाजिक कार्यकर्ते वासुदेव पोहरकर, शाम मालपे, लोणीचे माजी सरपंच नितीन टेंभे व अन्य मान्यवर.

# लक्ष्मणराव गीद यांचे सेवा कार्य ग्रामविकासासाठी प्रेरणादायी : माणिकदादा बेलूरकर

## सुरळी येथे शिवमंदिरात सत्कार सोहळा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – सुरळी येथील गुल्हाने परिवाराने उभारलेल्या शिवमंदिरात रविवारी (दि.२ ऑगस्ट) आयोजित कार्यक्रमात श्री गुरुदेव सेवा मंडळाचे ज्येष्ठ सेवक लक्ष्मणराव गीद यांच्या समाजोपयोगी व सेवाभावी कार्याचा गौरव करण्यात आला. यावेळी 'खेड्यातील खरा ग्रामनाथ म्हणजे शेतकरी असून, शेतकरी आणि समाजहितासाठी लक्ष्मणराव गीद यांनी केलेले सेवा कार्य प्रत्येकासाठी प्रेरणादायी आहे,' असे प्रतिपादन संत साहित्याचे अभ्यासक तथा अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळाचे जीवन प्रचारक माणिकदादा बेलूरकर यांनी केले. श्री गुरुदेव सेवक जगदीश महाराज गुल्हाने यांच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात विविध मान्यवरांच्या उपस्थितीत लक्ष्मणराव गीद यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. यावेळी सामाजिक कार्यकर्ते निळकंठ यावलकर यांनीही आपल्या मनोगतातून लक्ष्मणराव गीद यांचे समाजसेवा, ग्रामविकास आणि गुरुदेव सेवा मंडळासाठीचे योगदान उल्लेखनीय व अनुकरणीय असल्याचे सांगितले. कार्यक्रमाला ल्युबाताई यावलकर, चव्हाण, श्री गुरुदेव सेवक भागवत बहुरुपी, दादासाहेब निकम तसेच कोहळे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी माणिकदादा बेलूरकर यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचा 'परमहंस श्रीसमर्थ सद्गुरु आडकुजी महाराज चरित्रामृत' हा ग्रंथ भेट देऊन सन्मान करण्यात आला. उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात त्यांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी गीद, निकम, कोहळे, उघडे, साबळे, हेलोडे, हरि झोड तसेच गीद परिवारातील सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाला सुरळी गावातील शेकडो भाविक, महिला मंडळाच्या सदस्यांसह ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. राष्ट्रवंदनेने कार्यक्रमाची सांगता झाली.

### सोने-चांदीचे दर

शुध्द सोने –९६१०८१० रु.(१०ग्रॅम)

२२.कॅ सोने – ९४,७०० रु.(१०ग्रॅम)

चांदी – १,३०,००० रु. (प्र.किलो)

### कृषी उत्पन्न बाजार समिती अमरावती

**बाजारभाव ( क्विंटलमध्ये )**

| | | |
|---|---|---|
| ज्वारी – | १६५० – | २००० |
| गहू – | २५०० – | ३००० |
| तूर – | ६१०० – | ६३९० |
| मूग – | ६५०० – | ७००० |
| उडीद – | ६००० – | ७००० |
| हरभरा – | ५६०० – | ५९०० |
| सोयाबिन – | ४१०० – | ४३५० |
| बाजरा – | २००० – | २३०० |
| तिळ – | ८२०० – | ९३०० |
| भुईमूग – | ५१५० – | ५३५० |

# महाविद्यालय परिसरातच अल्पवयीन युवतीचा विनयभंग

## टेंभुरखेडा येथील युवकाविरुध्द गुन्हा दाखल

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**वरुड** – 'तु क्लास मध्ये का बसते व बाकी मुलासोबत का बोलते' असे म्हणत अल्पवयीन युवतीचा महाविद्यालय परिसरामध्ये विनयभंग करणाऱ्या टेंभुरखेडा येथील ३० वर्षीय युवकाविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

१६ वर्षीय फिर्यादी युवती गेल्या २१ जुलै रोजी सकाळी ११ वाजता महाविद्यालयामध्ये शिक्षण घेण्याकरीता गेली असता मध्यंतराच्या जेवणाच्या सुटटीत तिच्या मैत्राणीसोबत माळोदे यांच्या दुकानात खायला पॉकीट आणण्याकरीता गेली असता पॅकीट घेवून परत येत असतांना आरोपी सतिश उईके हा महाविद्यालया जवळ आला व फिर्यादीचा हात पकडुन म्हणाला की 'तु क्लास मध्ये का बसते व बाकी मुलासोबत का बोलते' फिर्यादीने त्याला हात सोड म्हटले तरी त्याने हात सोडला नाही, 'मी तुझा हात सोडत नाही, काय करत ते करुन घे' तेव्हा फिर्यादीच्या मैत्रीणीने वर्गामध्ये जावून शिक्षिकेला सांगीतले. शिक्षिका आणि शिक्षिक गोहाड असे महाविद्यालया बाहेर आले तेव्हा आरोपी निघुन गेला व 'तु माझ्या सोबत बोल नाही तर जिवाचे काही तरी करुन घेईल' अशी धमकी दिली हात पकडुन विनयभंग केल्याने फिर्यादीला लाज वाटली.

याप्रकरणी सदर अल्पवयीन युवतिच्या फिर्यादी वरुन वरुड पोलिसांनी सतिश अंशु उईके (वय ३०) रा.टेंभुरखेडा, ता.वरुड याचे विरुदध कलम ७४, ७८ (२), ३५१ (२), बिएनएस सहकलम १२ पोक्सो अन्वये गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरु आहे.



**वरुड :** राज्यसभा खासदार डॉ.अनिल बोंडे यांना अमरावती येथील निवासस्थानी वाढदिवसानिमित्त पुष्पगुच्छ देऊन हार्दिक शुभेच्छा देताना नगरपरिषद माजी उपाध्यक्ष किशोर भगत तथा भाजप महिला आघाडीच्या माजी शहराध्यक्षा माधुरी भगत.

# मोर्शी उपजिल्हा रुग्णालयात २६ रुग्णांवर यशस्वी शस्त्रक्रिया

## महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य व आयुष्मान भारत योजनेअंतर्गत आयोजित शस्त्रक्रिया शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**मोर्शी** – महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना व आयुष्मान भारत जनआरोग्य योजना अंतर्गत मोर्शी येथील उपजिल्हा रुग्णालयात रविवारी (दि.२ ऑगस्ट) आयोजित करण्यात आलेल्या विशेष शस्त्रक्रिया शिबिरात तब्बल २६ रुग्णांवर यशस्वी सामान्य शस्त्रक्रिया करण्यात आल्या. या शिबिरामुळे परिसरातील अनेक गरजू रुग्णांना मोफत व दर्जेदार शस्त्रक्रियेचा लाभ मिळाला.

शिबिरात हर्निया, हायड्रोसिल, अंबिलिकल हर्निया, अपेंडिक्स तसेच इतर सामान्य शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पाडण्यात आल्या. अनुभवी तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शस्त्रक्रिया सुरक्षित व नियोजनबद्ध पद्धतीने पार पडल्या. यावेळी उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.प्रमोद पोतदार, शल्यचिकित्सक डॉ.प्रविण बिजवे, डॉ.राहुल खन्ना तसेच भूलतज्ज्ञ डॉ.जगदीश काळभोर यांनी शस्त्रक्रिया यशस्वी होण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले. हे शिबिर जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.विनोद पवार तसेच निवासी बाह्य संपर्क अधिकारी डॉ.संदीप हेडाऊ यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. शिबिराच्या नियोजनात वरूड व मोर्शीचे वैद्यकीय समन्वयक डॉ.घनश्याम मानकर व डॉ.प्रेरणा वानखेडे यांनी विशेष समन्वय साधला. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी वर्षा दारोकर, प्रतीक्षा पांचाळे, रेशमा बहुरूपी, मीनाक्षी मेश्राम, अंकित नेवारे, स्नेहल बेहेरे, अश्विनी तिजारे, दीपिका गोटे, सागर झटाले, नौशाद खान, हबीब खान, ज्ञानेश्वर टाकळे, प्रवीण कापडे, शोभा इंगळे, संगीता तायवा तसेच महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य व आयुष्मान भारत जनआरोग्य योजनेचे वसीम शेख व प्रकाश पांडे यांच्यासह सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. या शिबिरामुळे परिसरातील रुग्णांना मोठ्या शहरात जाण्याची गरज न पडता स्थानिक स्तरावरच तज्ज्ञ डॉक्टरांकडून दर्जेदार उपचार उपलब्ध झाले. त्यामुळे रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांनी उपजिल्हा रुग्णालय प्रशासनाचे आभार व्यक्त केले.

# स्टार किड्स कार्निवल प्रि-स्कूल येथे पालक-शिक्षक सभा उत्साहात





(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – येथील मॉ जिजाऊ चॅरिटेबल ट्रस्ट द्वारा संचालित स्टार किड्स कार्निवल प्रि–स्कूल येथे पालक–शिक्षक सभा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. सभेत पालक प्रतिनिधींची निवड करण्यात आली तसेच बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी पालक आणि शाळा यांच्यातील समन्वयाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून पवन देशमुख, अनिल थोटे, कोमल टाकरखेडे, सुनयना हरणे, पुनम पंडागडे, ट्रस्टचे सचिव तथा मुख्याध्यापक उमेश बंड तसेच कोषाध्यक्ष सुचिता बंड उपस्थित होते.

सभेत विविध वर्गांसाठी पालक प्रतिनिधींची निवड करण्यात आली. नर्सरी वर्गासाठी स्वाती फसाटे, निलेश गोहाड, वानखेडे आणि पवन घारड यांची निवड करण्यात आली. केजी–१ साठी संपदा अकर्ते, सौरभ चौधरी, युगंधरा कराळे आणि संजय वाघ यांची पालक प्रतिनिधी म्हणून निवड झाली. तर केजी–२ साठी अमोल खुजे, पूजा ढोक आणि शाहिस्ता खान यांची निवड करण्यात आली. यावेळी मुख्याध्यापक उमेश बंड व सुचिता बंड यांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे संचालन सुचिता बंड तरआभार श्रुती गायकवाड यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शामल तरासे, अंकिता पाटील, साक्षी हिवसे, प्रतीक्षा यादव, शीतल गावंडे, आशिका भुयार आणि भारती काळे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## एनटीआर हायस्कूल येथे

# लोकमान्य टिळक व अण्णाभाऊ साठे जयंती उत्साहात

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – स्थानिक नवयुवक शिक्षण संस्था संचालित नामदेवराव तुकारामजी रडके (एनटीआर) हायस्कूल येथे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त तसेच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त अभिवादनपर कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना राष्ट्रभक्ती, सामाजिक समता आणि शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करणारा प्रेरणादायी संदेश देण्यात आला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक योगेश बरडिया तर पर्यवेक्षक शशांक पाचघरे, शिक्षक प्रतिनिधी सतीश डाखोळे यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात लोकमान्य टिळक व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पण करुन करण्यात आली.

अध्यक्षीय भाषणात मुख्याध्यापक योगेश बरडिया यांनी विद्यार्थ्यांना लोकमान्य टिळक व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचा आदर्श जीवनात अंगीकारण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे संचालन चंचल खुजे व लक्ष्मी पोद्दार यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कोमल वांगे, प्रणाली पटले, ऋषिकेश चौधरी व प्रगती फुटाणे यांनी विशेष सहकार्य केले.

# राज्य धर्मस्वातंत्र्य विधेयकाला राष्ट्रपतींची मंजुरी : राज्यात कायदा लागू, बेकायदेशीर धर्मांतर करणाऱ्यांना १० वर्षांपर्यंतचा कारावास

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – राज्य विधिमंडळाने संमत केलेल्या 'महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य कायदा, २०२६' या विधेयकाला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची मंजुरी मिळाली आहे. या संदर्भातील अधिकृत राजपत्र प्रसिद्ध झाल्याने राज्यात ३० जुलै २०२६ पासून हा कायदा लागू झाला आहे. या कायद्यानुसार आता आमिष, फसवणूक, बळजबरी, लबाडी, अल्पवयीन अशाप्रकारे केल्या जाणाऱ्या बेकायदेशीर धर्मांतराला आळा बसेल. तसेच अशाप्रकारे धर्मांतर करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई केली जाईल. या कायद्यानुसार बेकायदेशीर धर्मांतर करणाऱ्यांना १० वर्षांपर्यंतचा कारावास आणि ७ लाख रुपयांपर्यंतच्या दंडाची तरतूद करण्यात आली आहे. राज्य विधि मंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात या कायद्याबाबतचे विधेयक विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांत मंजूर करण्यात आले होते. नंतर हे विधेयक राष्ट्रपतींच्या मंजुरीसाठी पाठविण्यात आले होते. त्याला राष्ट्रपतींनी मंजुरी मिळाल्याने या कायद्याची अंमलबजावणीही सुरू झाली.

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील**
**श्री.व्ही.व्ही.राजुरकर, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.१५५/२०२६ ने.ता.०९/०९/२०२६**

**अर्जदार :-**

१) श्रीमती सरला अशोकराव वानखडे, वय अं.४९ वर्ष, धंदा-गृहिणी, २) कु.साक्षी अशोकराव वानखडे, वय अं.२५ वर्ष, धंदा- शिक्षण, ३) चि.ऋषिकेश अशोकराव वानखडे, वय अं.२२ वर्ष, धंदा- शिक्षण, सर्व रा.जामगांव, ता.वरुड

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत अशोक नथ्थुजी वानखडे, रा.जामगांव, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०९/०९/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **३०/०७/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील**
**आय.जे.ठाकरे साहेब, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.६५३/२०२६ ने.ता.०३/०९/२०२६**

**अर्जदार :-**

१) श्रीमती आशा गणपत गुंबळे, वय अं.७५ वर्ष, धंदा-गृहिणी
२) प्रमोद गणपतराव गुंबळे, वय अं.५५ वर्ष, धंदा- शेती
क्र.१ व २ रा.वार्ड क्र.१८, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती
३) विनोद गणपतराव गुंबळे, वय अं.५२ वर्ष, धंदा- शेती
रा.प्लॉट न.१२४, कामाक्षी सोसायटी, म्हाडगी नगर, नागपूर

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत गणपत बळीरामजी गुंबळे (झुंबळे), रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०३/०९/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख २९/०७/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील**
**आय.जे.ठाकरे साहेब, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.६४१/२०२६ ने.ता.०२/०९/२०२६**

**अर्जदार :-**

१) वंदना घनश्याम घोंगडे, वय अं.५२ वर्ष, धंदा-घरकाम
२) उदय घनश्याम घोंगडे, वय अं.२८ वर्ष, धंदा- शेती
३) आदेश घनश्याम घोंगडे, वय अं.२६ वर्ष, धंदा- शेती
सर्व रा.जामगांव, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत घनश्याम आनंदराव घोंगडे, रा.जामगांव, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०२/०९/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख २७/०७/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील**
**एम.डी.सैंदाणे साहेब, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.६४०/२०२६ ने.ता.०७/०९/२०२६**

**अर्जदार :-**

हरिभाऊ कृष्णराव घंगारे
वय अं.६९ वर्ष, धंदा-सेवानिवृत्त
रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती
ह.मु.रा.गोधनी रोड नागपूर, ता.जि.नागपूर

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत मंगला केशव घंगारे, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०७/०९/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख २७/०७/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

# युरियाचा ८८ लाखांचा काळाबाजार उघडकीस : खताच्या ७२८ गोण्या जप्त, लासलगाव पोलिसांची मोठी कामगिरी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**लासलगाव** – सध्या युरियाचा टंचाईला शेतकऱ्यांना सामोरे जावे लागत असताना अनुदानित युरिया खताचा काळा बाजार उघडकीला आला असून विंचूरजवळील विष्णुनगर येथे युरियाचा काळा बाजार करणाऱ्यांवर लासलगाव पोलिसांनी केलेल्या धडक कारवाईत ८८ लाख ३६ हजार ६२४ रुपये किमतीचा युरियासह मुद्देमाल जप्त केला.

विंचूरजवळ विष्णुनगर परिसरातील कांदा खळ्याच्या भागात शेती उपयोगी युरियाचा काळा बाजार होणार असल्याची गोपनीय माहिती मिळालीनंतर पोलिसांनी क्रांती हॉटेलच्या पाठीमागे छापा टाकला असता आयशर वाहनातून लातूर येथून आणलेला अनुदानित युरियाचा साठा व्यावसायिक विक्रीच्या उद्देशाने दुसऱ्या मालट्रकमध्ये भरला जात होता. घटनास्थळी कृषी विभागाच्या पथकाला पाचारण करण्यात आले. पोलिसांनी दोघा व्यक्तींची चौकशी केली असता बातमीची खात्री पटली आणि कृषी अधिकाऱ्यांच्या फिर्यादीवरून लासलगाव पोलीस ठाण्यात अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५ मधील कलम ३ (२), (व), ७, ८, ९, १० आणि भारतीय न्याय संहिता कलम ३१८ (४), ३ (५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

या प्रकरणी ज्ञानेश्वर पवार (३७) आणि सागर गरड (२७) या दोघा आरोपींना अटक केली. त्यांच्याकडून ७२८ गोण्या युरिया व दोन वाहनांसह सुमारे ८८ लाख ३६ हजार ६२४ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या संबंधी पुढील अधिक सखोल तपास पोलीस करत आहेत.

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील**
**श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दुसरे सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.६३९/२०२६ ने.ता.०३/०९/२०२६**

**अर्जदार :-** १) सौ.शालुताई दामोधरराव लंगोटे, वय अं.६५ वर्ष, धंदा-घरकाम, मु.पो.साऊर, २) सौ.सिंधुताई वासुदेवराव जिचकार, वय अं.६१ वर्ष, धंदा-घरकाम, मु.पो.पेठ मांगरुळी, ३) सौ.संगिता रमेशराव वानखडे, वय अं.५२ वर्ष, धंदा-घरकाम, मु.पो.शेंदुरजनाघाट, ४) श्री.गजेंद्र उर्फ गजानन रामा उर्फ रामभाऊजी भोगे, वय अं.५० वर्ष, धंदा-मजुरी, मु.पो.मोरचुंद

**... विरुध्द ...** **गैरअर्जदार :-** १) सौ.अरुणाताई किसनराव चोरे, वय अं.६३ वर्ष, धंदा-घरकाम, मु.पो.पेठ मांगरुळी, २) कै.संजय रामा उर्फ रामभाऊजी भोगे (मय्यत मृत्यू दि.०९/०८/२०२३), २-अ) श्रीमती सविता संजयराव भोगे, वय अं.५२ वर्ष, धंदा-घरकाम व शेती, २-ब) विशाल संजयराव भोगे, वय अं.२८ वर्ष, धंदा-शेती, दोघेही रा.मोरचुंद, ता.वरुड

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत रामाजी उर्फ रामभाऊ चंद्रभानजी भोगे व मयत श्रीमती कलावती रामभाऊजी भोगे, रा.मोरचुंद, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०३/०९/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख ३०/०७/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील**
**एम.डी.सैंदाणे, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.६५२/२०२६ ने.ता.१५/०९/२०२६**

**अर्जदार :-**

१) श्रीमती सुरेखा रामभाऊ बरडे (बर्डे), वय अं.५६ वर्ष, धंदा-घरकाम, २) आदीत्य रामभाऊ बरडे, वय अं.३३ वर्ष, धंदा- नोकरी, क्र.१ व २ रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती, ३) राहुल रामभाऊ बरडे, वय अं.३५ वर्ष, धंदा- व्यवसाय रा.पुणे

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत रामभाऊ आत्मारामजी बरडे, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.१५/०९/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख २७/०७/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील**
**एम.डी.सैंदाणे, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.६३४/२०२६ ने.ता.३१/०८/२०२६**

**अर्जदार :-**

१) नारायण गोविंदराव गडवे, वय अं.६४ वर्ष, धंदा-मजुरी
२) कैलास गोविंदराव गडवे, वय अं.५७ वर्ष, धंदा- मजुरी
क्र.१ व २ रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत गोविंदराव लहानुजी गडवे, मयत सखुबाई गोविंदराव गडवे व अशोक गोविंदराव गडवे, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.३१/०८/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख २७/०७/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

### तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, वरुड यांचे न्यायालय

**क्रप्रस्तु-१/कावी-३७५/२५-२६ दि.२९/०७/२६**

**जाहीरनामा :-**

याद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, **अनवर खान वहाब खान, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती यांनी नगर परिषद वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी जन्म-मृत्यु नोंदणी अधिनीयम १९६९ व सुधारणा अधिनीयम २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म मृत्यू नोंद करण्याबाबत विहीत अर्ज या कार्यालयात सादर केलेला आहे. सदर अर्जात अर्जदार यांनी **स्वत: नामे अनवर खान वहाब खान, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती, यांचा जन्म दि.२४/०७/१९७६** नोंद करण्यासाठी आदेश होण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार जन्म-मृत्यू चे नोंद घ्यावी या करीता सदरहू प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ डेथ ॲक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्म मृत्यूची नोंद होण्यासाठी न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

सदर विषयी ज्या कोणास हरकत वा आक्षेप घ्यावयाचे असल्यास जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात समक्ष हजर राहुन या न्यायालयात स्वत: किंवा वकीलामार्फत हजर हरकत दाखला करावी अन्यथा प्रकरणात उक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.


आज रोजी २९/०७/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**तहसिलदार**
**वरुड**


राज्यसभा खासदार मा.श्री.डॉ.अनिलजी बोंडे साहेब
यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
पंकज मालपे
शासकीय कॉन्ट्रॅक्टर लोणी


राज्यसभा खासदार तथा भाजपा माजी जिल्हाध्यक्ष
डॉ. अनिलजी बोंडे साहेब
यांना
वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक :-
डॉ.मनोहर आंडे
स्त्रीरोग व प्रसूतीतज्ञ, वरुड
डॉ.सोनाली आंडे
बधिरीकरण तज्ञ, वरुड


राज्यसभा खासदार तथा भाजपा माजी जिल्हाध्यक्ष
डॉ.अनिलजी बोंडे साहेब
यांना
वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा!
शुभेच्छुक :-
इंजि.ईश्वर सलामे
नगराध्यक्ष न.प.वरुड


राज्यसभा खासदार तथा भाजपा माजी जिल्हाध्यक्ष
डॉ. अनिलजी बोंडे साहेब
यांना
वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा!
गोपाल न. मालपे
संस्थापक अध्यक्ष
शुभेच्छुक :-
वासुदेव पोहरकर (उपाध्यक्ष) | योगेश सं. वांगे (कार्य संचालक) | अरूण खेरडे | सुधीर ढोले | संजय गुल्हाने
दामोधर आंडे | लक्ष्मीकांत काळे | सुधीर पां. बायमोरे | आशा ना. देशमुख | आशा प्र. मालपे
(सर्व संचालक) व प्रविण ना. मेंढे (व्यवस्थापक)
वं. वसंतदास महाराज ग्रा. बि. शेती सहकारी पतसंस्था लोणी
राज्य व विदर्भस्तरीय पुरस्कारांनी गौरवलेली एकमेव पतसंस्था (ऑडिट वर्ग अ)
बँको पुरस्कार सतत सात वर्षापासून (2019 ते 2026)
महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशन पुणे द्वारा दीप स्तंभ पुरस्कार सतत सात वर्षापासून (2021 ते 2026)
सतत सात वर्षापासून विदर्भ स्तरीय प्रथम पुरस्कार
सतत चार वर्षापासून जिल्हास्तरीय प्रथम पुरस्कार


तुम जियो हजारो साल, साल के दिन हो पचास हजार
राज्यसभा खासदार तथा भाजपा माजी जिल्हाध्यक्ष
डॉ.अनिलजी बोंडे साहेब
आपणांस वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा
राजेंद्र आंडे
अमित कुबडे
राजकुमार राऊत
श्रीधर सोलव
सरीता खेरडे
अर्चना नि.मुठमकर
डॉ.प्रमोद पोतदार
प्रशांत सावरकर
मोरेश्वर वानखडे
तुषार निकम
रुपेश मांडवे
अनिल डबरासे
विशाल सावरकर
डॉ.महेंद्र राऊत
निळकंठ मुरुमकर
अनिल गुल्हाने
डॉ.रंजन बेलसरे
डॉ.भुषण खोले
डॉ.शुभांगी भु.खोले
डॉ.चेतन कोल्हटकर
डॉ.प्रियाली चे.कोल्हटकर
भारती प्र.माळोदे
अंजली यो.तुमराम
विनय खासबागे
नितीन खेरडे
योगेश्वर खासबागे
गोपी अढाऊ
गौरव इंगळे
देवेंद्र बोडखे
अनिता पराते
रेखा रा.काळे
छाया सु.दुर्गे
डॉ.निलेश बेलसरे
डॉ.कुणाल बिजवे
कमलाकर देशमुख
डॉ.अमोल कोहळे
ॲड.आशिष वानखडे
नरेंद्र बेलसरे
देवेंद्र खेरडे
भारत खासबागे
निलेश फुटाणे
डॉ.नितीन वानखडे
सुधाकर मानकर
नितीन गुर्जर
किशोर भगत
माधुरी कि.भगत
नलिनी प्र.रक्षे
प्रितम अबुक
लोकेश अग्रवाल
चंदु वानखडे
ॲड.शशिकांत उमेकर
शिवा शिवहरे
अशोक नानोटकर
उमेश कांडलकर
सुरेश इंगळे
स्वप्नील मांडळे
राजेश शहाणे
पंकज खेरडे
राहुल लोखंडे
धिरज गुल्हाने
मनोज माहुलकर पाटील
राजेंद्र सोनुले
अनुप नागमोते
धनंजय बोकडे
सुधिर धर्मे
रामकृष्ण शिरुळकर
निलेश माकोडे
श्रीपाद चांगदे
राहुल बेलसरे
रविंद्र निंभोरकर
रोशनी र.निंभोरकर
रामा खोडे
डॉ.शशिभुषण उमेकर
चंद्रशेखर भोकरे
किशोर गुल्हाने
रोशन कळमकर
गोपाल पुंड
राजेंद्र श्रीराव
अनिल शिरभाते
राजेंद्र काळे
गणेश शेकापुरे
सुरेश दुर्गे
दिपक पवार
अमित खेरडे
संजय वंजारी
प्रशांत शिरभाते
प्रज्योत खसारे
दिलीप खेरडे
दर्शन अग्रवाल
मंगेश कोहळे
प्रतिक खेरडे
दिपक कडू
दिनेश सनेसर
मनोज मोरे
गजानन खडसे